महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.आस्था-१९२५/ प्र.क्र.६७/ वि.स.केंद्र/सेवानिवृत्त कंत्राटी/ Districy Nodal Officer/१७५४/२०२६ दिनांक : 22 JUL 2026

## जाहीर सूचना

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षांतर्गत महाराष्ट्रातील **ठाणे, उल्हासनगर, पुणे, जालना, नंदुरबार, नाशिक** या सहा ठिकाणी स्थापन केलेल्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष विस्तार केंद्र (विद्यार्थी सहाय्यता केंद्र) येथील कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे पदाकरिता सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडून कंत्राटी तत्वावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

<u>पदाचा तपशील</u>

| अ.क्र | पदाचे नाव | पदसंख्या | वेतन |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा संपर्क अधिकारी<br>(महाराष्ट्रातील ठाणे, उल्हासनगर, पुणे, जालना, नंदुरबार, नाशिक या सहा ठिकाणी प्रत्येकी एक जिल्हा संपर्क अधिकारी) | ६ | माहे रु ६४,०००/- |

<u>अर्ज करण्यासाठी अटी व पात्रताः</u>

१. अधिव्याख्याता, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक या पदावर किमान १० वर्षे काम केल्याचा अनुभव अनिवार्य राहील.

२. संगणक व माहिती तंत्रज्ञानाचे पुरेसे ज्ञान असणे गरजेचे. पदव्युत्तर पदवीधारकांना प्राधान्य.

३. विविध व्यावसायिक (अभियांत्रिकी, उच्च, आयुष, वैदकीय, कला व कृषी) अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परीक्षा (CET) आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) यांचे ज्ञान व अनुभव असलेल्यांना प्राधान्य.

४. एम.एस. ऑफिस, स्कॅनिंग, प्रिंटिंग आणि मूलभूत डिजिटल / पोर्टल ऑपरेशन्स, तसेच CET पोर्टलची माहिती असणे आवश्यक.

५. निवृत्तीच्या वेळी अथवा सध्या त्यांच्या विरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी/न्यायालयीन कार्यवाही प्रलंबित नसावी.

६. जाहिरातीच्या दिनांकास अर्जदाराचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

७. उत्कृष्ट संवाद, समन्वय आणि समुपदेशन कौशल्य आवश्यक.

८. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांवर प्रभुत्व असणे आवश्यक.

९. संबंधित जिल्ह्यात राहणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य. राहण्याची व जेवणाची कोणतीही सुविधा उपलब्ध करून दिली जाणार नाही.

१०. नियुक्ती पूर्णतः कंत्राटी स्वरूपाची असून कालावधी एक वर्षाचा राहील.किमान सहा महिने सेवा आवश्यक असून सेवा करार वाढविणे, तसेच सेवा समाप्त करण्याचा अधिकार सक्षम अधिकाऱ्याचा राहील.

११. अपवादात्मक परिस्थिती व सक्षम अधिकारी यांच्या मान्यतेशिवाय राजीनामा स्वीकारला जाणार नाही.

मुख्य जबाबदाऱ्याः

(१) विद्यार्थ्यांना CET अभ्यासक्रम, पात्रता निकष, अर्ज प्रक्रिया, परीक्षा पद्धत व वेळापत्रक याबाबत सविस्तर माहिती उपलब्ध करून देणे; CAP प्रक्रियेतील अर्ज भरणे, दस्ताऐवज अपलोड करणे, शुल्क भरणा, पर्याय नोंदणी व अलॉटमेंटपर्यंत सर्व टप्प्यांत तांत्रिक सहाय्य करणे; फ्रंट डेस्कवर पोर्टल, लॉगिन, पेमेंट, दस्ताऐवज अद्ययावत इत्यादी तांत्रिक समस्यांवर मार्गदर्शन करणे; विविध शिष्यवृत्तीबाबत माहिती देणे, तसेच विद्यार्थ्यांच्या आवड, क्षमता व संधी विचारात घेऊन अभ्यासक्रम-संस्था निवड, करिअर समुपदेशन, Predictive Counseling, Alternative Program Guidance आणि Course Mapping प्रदान करणे.

(२) केंद्रातील प्रशासकीय कामकाजाचे प्रभावी पर्यवेक्षण करणे आणि तांत्रिक मदतनीस, समुपदेशक व इतर कर्मचारी यांच्या कार्यावर देखरेख ठेवणे.

(३) जिल्ह्यातील शैक्षणिक संस्था, परीक्षा केंद्रे आणि राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यात आवश्यक समन्वय राखणे.

(४) विद्यार्थ्यांच्या शंका व तक्रारींची नोंद ठेवून त्यांचे निवारण करणे तसेच प्रलंबित तक्रारींसाठी संबंधित कार्यालयांशी / संचालनालयांशी समन्वय साधणे.

(५) सीईटी कक्षाच्या निर्देशाप्रमाणे निश्चित कालावधीनुसार मासिक व आवश्यक ते इतर अहवाल तयार करून सादर करणे.

अर्ज करण्याची पद्धतः

इच्छुक पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी **दिनांक ३० जुलै २०२६ पर्यंत** विहित नमुन्यातील अर्ज व विवरणपत्र est.cetcell@gmail.com या ई-मेलवर पाठवावा. निर्धारित दिनांकानंतर प्राप्त अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. कोणत्याही पत्रव्यवहाराचा विचार केला जाणार नाही. निवड मुलाखतीच्या आधारे केली जाईल व मुलाखत सीईटी कक्षाच्या मुंबई कार्यालयात घेतली जाईल. कोणताही प्रवासभत्ता देय राहणार नाही. निवडीबाबतचा अंतिम निर्णय सीईटी कक्षाचा राहील.

नियुक्ती पूर्णत: तात्पुरती व सुरुवातीला एक वर्षापुरती मर्यादित राहील. काम असमाधानकारक आढळल्यास मा.आयुक्त यांच्या अनुमतीने एक महिन्याची नोटीस देऊन सेवा समाप्त केली जाऊ शकते.

अधिक माहितीसाठी संपर्क:
०२२-२२०१६१५३/ ५७/ ५९
स्थळ- मुंबई

(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा
(सीईटी) कक्ष,मुंबई

## अर्जाचा नमुना

## सेवानिवृत्त राज्य शासकीय कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज. पदाचे नाव- जिल्हा संपर्क अधिकारी महाराष्ट्रातील ठाणे, उल्हासनगर, पुणे, जालना, नंदुरबार, नाशिक या सहा जिल्हयांसाठी

अर्जदाराने अलीकडील काळातील स्वत :चे छायाचित्र येथे चिकटवावे

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अर्जदाराचे संपूर्ण नाव | : | ---------------------------------------------- |
| २) | जन्म दिनांक व वय | | ----/----/------ |
| ३) | सेवानिवृत्त दिनांक | | ----/----/------ |
| ४) | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद | | ---------------------------------------------- |
| ५) | सेवानिवृत्त झालेल्या कार्यालयाचे नाव व पत्ता | | ---------------------------------------------- |
| ६) | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेल्या पदाचे ग्रेड वेतन सातव्या/ वेतन आयोगानुसार वेतनस्तर | | ---------------------------------------------- |
| ७) | सेवानिवृत्ती वेळेस कार्यरत असलेल्या विभागाचे नाव | | ---------------------------------------------- |
| ८) | संबंधित प्रशासकीय विभाग | | ---------------------------------------------- |
| ९) | अर्जदाराचा पत्ता | : | ---------------------------------------------- |
| १०) | भ्रमणध्वनी क्रमांक | : | ---------------------------------------------- |
| ११) | ईमेल | : | ---------------------------------------------- |
| १२) | सेवेत असताना शिक्षा झालेली आहे का | : | ----/----/------ |
| १३) | आवश्यक असलेली अर्हता अर्जदारास आहे काय? | : | होय / नाही |
| १४) | अनुभव | : | ---------------------------------------------- |

महाराष्ट्र अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियम) अधिनियम २०१५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षात निव्वळ कंत्राटी तत्वावर सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी **(जिल्हा संपर्क अधिकारी- राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष विस्तार केंद्रांसाठी)** या पदाकरिता प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात / सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील /सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :

दिनांक : **अर्जदाराची स्वाक्षरी**

सहपत्रे : सर्व आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे

(टिप : उपरोक्त नमूद माहिती आवश्यक असल्याने संपूर्ण माहिती सादर करणे अनिवार्य आहे.